पुढारी

# सर्वोत्तमतेचा ध्यास घेऊन विद्यार्थ्यांनी कारकीर्द घडवावी

## कुलगुरू डॉ. शिंदे; विद्यापीठात 'निवृत्त शिक्षकांच्या शिष्यवृत्ती'चे वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी सुद्धा चांगल्या शिक्षकांचा आदर्श घेऊन आयुष्यात सर्वोत्तमतेचा ध्यास घेऊन कारकीर्द घडवावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या २०१८-१९ साठीच्या 'निवृत्त शिक्षकांच्या शिष्यवृत्ती'चे गुरुवारी शिक्षक दिनाचे औचित्य साधून वितरण आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील एम. एस्सी. भाग - २ मधील विद्यार्थी अजिंक्य राम भोसले आणि दामिनी प्रकाश माळी या दोघांना या शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रसूल कोरबू, डॉ. अप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनचे रेक्टर डॉ. संभाजी शिंदे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जी. एस. राठोड उपस्थित होते.



**कोल्हापूर : विद्यापीठात शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अजिंक्य भोसले, दामिनी माळी यांचा 'निवृत्त शिक्षकांच्या शिष्यवृत्ती'चे वितरण करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी.**

लोकमत

### शिवाजी विद्यापीठ : जिल्हास्तरीय १८ सप्टेंबरपासून; सांघिक, वैयक्तिक स्पर्धा

# मध्यवर्ती युवा महोत्सव ‘फलटण’मध्ये

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचा ३९ वा मध्यवर्ती युवा महोत्सव यावर्षी फलटण येथील मुधोजी महाविद्यालयात रंगणार आहे. दि. २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान हा महोत्सव होणार आहे. मध्यवर्ती आणि जिल्हास्तरीय महोत्सवाचे वेळापत्रक विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळातर्फे निश्चित करण्यात आले असून, ते संकेतस्थळावर बुधवारी प्रसिद्ध केले.

युवामहोत्सव द्विस्तरीय पद्धतीने होणार आहे. यावर्षी जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धा आयोजित केल्या आहेत. जिल्हास्तरीय महोत्सव दि. १८ सप्टेंबरपासून घेण्यात येणार आहेत. एकांकिका, लोकनृत्य, लोककला, वाद्यवृंद, लघुनाटिका, पथनाट्य, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, मूकनाट्य, वादविवाद या स्पर्धा जिल्हास्तरीय युवा महोत्सवात होतील. या स्पर्धांसह शास्त्रीय नृत्य, व्यंगचित्र, भित्तीचित्र, कोलाज, मातीकाम, रांगोळी, स्थळचित्रण, छायाचित्रण, शास्त्रीय गायन, सुगम गायन, पाश्चिमात्य एकल गायन, पाश्चिमात्य समूहगीत, भारतीय समूहगीत, नकला, एकपात्री, शास्त्रीय सूरवाद्य, तालवाद्य, मेहंदी या स्पर्धा मध्यवर्ती महोत्सवामध्ये होणार आहेत. पहिल्या टप्प्यात जिल्हास्तरीय महोत्सव होईल. त्यातील विविध स्पर्धांमधील पहिल्या तीन क्रमांकांचे विजेते मध्यवर्ती महोत्सवात सहभागी होणार आहेत. जिल्हा पातळीवरील महोत्सवात विविध कलाप्रकारांतील १४ आणि मध्यवर्ती महोत्सवामध्ये ३२ स्पर्धा होणार आहेत. त्यामध्ये सुमारे ९०० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होतात. महोत्सवाचे वेळापत्रक संलग्नित सर्व महाविद्यालयांना पाठविण्यात आले आहे. महाविद्यालयांनी महोत्सवासाठीच्या प्रवेशिका तीन प्रतींमध्ये योग्य शुल्कासह विद्यार्थी विकास मंडळाकडे पाठविण्याची मुदत दि. ९ सप्टेंबरपर्यंत आहे, अशी माहिती विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.



### असा होणार
## जिल्हास्तरीय महोत्सव

- **कोल्हापूर** : डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग जयसिंगपूर (दि. १८ सप्टेंबर)
- **सांगली** : वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द (दि. २० सप्टेंबर)
- **सातारा** : प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर (दि. २२ सप्टेंबर)

लोकमत

अनेक ठिकाणी गुरुजनांचा सत्कार : विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन

# शहरामध्ये 'शिक्षक दिन' उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध महाविद्यालये, शाळांमध्ये 'शिक्षक दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. विविध शाळा व महाविद्यालयांत विद्यार्थ्यांकडून शाळेतील शिक्षकांचा पुस्तक, फुले आणि पेढा भरवून सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांबद्दल आदराची भावना व्यक्त करणारी मनोगते सादर केली. काही शाळांत शिक्षकांवर तयार केलेल्या कविता सादर केल्या. शिक्षकांनी डॉ. राधाकृष्णन यांची माहिती मुलांना सांगून आपल्या शिक्षकांचे स्मरण केले. त्यानंतर शिक्षक बनलेल्या विद्यार्थ्यांनी परिपाठापासून ते सर्व तासिका शिकविण्याचे काम केले.



**बी वॉर्ड अन्याय निवारण कृती समितीच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.**

### बी वॉर्ड अन्याय निवारण कृती समिती

बी वॉर्ड अन्याय निवारण कृती समितीच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त पूरपरिस्थितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली खऱ्या अर्थाने माणुसकी दाखवित मदत केल्याबद्दल सत्कार केला. विद्यापीठाने ३५० प्रवाशांची राहण्याची व्यवस्था, शहरातील लोकांसाठी पिण्याच्या पाण्याच्या टँकरची सोय केली होती. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कृती समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, समितीचे अध्यक्ष रामेश्वर पतकी, किसन कल्याणकर, उपाध्यक्ष पृथ्वीराज जगताप, सेवक संघाचे उपाध्यक्ष अजय आयरेकर, सुरेश पाटील, सतीश पोवार आदी उपस्थित होते.

### शाहू महाविद्यालय

राजर्षी शाहू महाविद्यालयात डॉ. एम. बी. शेख यांनी शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. राजेंद्र देठे, ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य एन. एस. साळुंखे, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. संजय साठे, डॉ. भाग्यश्री पुणतांबेकर, प्रा. विनोद आखाडे, प्रा. समाधान जाधव, आदी उपस्थित होते.

### कमला महाविद्यालय

कमला महाविद्यालयात प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. तेजस्विनी पाटील, प्रा. अनिल घस्ते, डॉ. नीता धुमाळ, प्रा. रेखा पंडित, आदी उपस्थित होते.

### लोकमान्य विद्यालय

प्रतिभानगर येथील लोकमान्य विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त शाळेची सजावट करण्यात आली होती. यावेळी संस्थेचे सेक्रेटरी जितेंद्र पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. शाळेतील पहिली ते सातवीच्या ४० विद्यार्थ्यांनी अध्यापनाचे काम केले.

पुढारी

# विद्यापीठात गुणवत्ता शिष्यवृत्तीप्राप्त महाविद्यालय प्राचार्यांचा सत्कार



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीचे विजेत्या महाविद्यालयांचे प्राचार्य व सहकाऱ्यांना वितरण करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा संचालक गजानन पळसे आदी. (छाया : पप्पू अत्तार )**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील पदार्थ विज्ञान अधिविभाग सभागृहात मंगळवारी शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षातील शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमधील गुणवंत महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा गुणगौरव समारंभ उत्साहात पार पडला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे प्रभारी यांची प्रमुख उपस्थिती होती. गुणगौरव समारंभात चालू शैक्षणिक वर्षामधील कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र, सामाजिकशास्त्र विद्याशाखानिहाय सर्वाधिक शिष्यवृत्ती मिळवणाऱ्या शहरी, निमशहरी व ग्रामीण या गटातून सर्वप्रथम आलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा प्रशस्तीपत्र, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात




आला.

विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील संलग्नित महाविद्यालयातील ४६५ विद्यार्थ्यांना ३० लाख ८० हजार रुपये इतक्या रकमेची शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली आहे. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. अभिजित लिंग्रस यांनी सूत्र संचालनकेले. रमेशढोणुक्षेयांनीआभार मानले.

**गुणवंत महाविद्यालये पुढीलप्रमाणे:**

**कला विद्याशाखा :** शहरी गट : छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा / निमशहरी गट : सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, जि. सातारा (समान गुण) यशवंतराव चव्हाण आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, उरुण इस्लामपूर, जि. सांगली,/ग्रामीण गट : श्रीपतराव चौगुले आर्टस् अँड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली, जि. कोल्हापूर.

**वाणिज्य विद्याशाखा :**

शहरी गट : डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर./निमशहरी गट : श्री. व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर. ग्रामीण गट : श्री. शिव-शाहू महाविद्यालय, सरूड, जि. कोल्हापूर.

**विज्ञान विद्याशाखा :**

शहरी गट : विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर निमशहरी गट : शिवराज महाविद्यालय साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर. ग्रामीण गट : दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, जि. कोल्हापूर.

**अभियांत्रिकी विद्याशाखा :**

शहरी गट : तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. निम शहरी गट : डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, जयसिंगपूर जि. कोल्हापूर. ग्रामीण गट : तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, वारणानगर, जि. कोल्हापूर.

**विधी विद्याशाखा :** शहरी गट : शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर. **शिक्षणशास्त्र :** निमशहरी गट : संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली. सामाजिक शास्त्रे : शहरी गट : यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशल वर्क, जकातवाडी, सातारा.

पुढारी

# एम. फिल., पीएच. डी. प्रवेश परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एम.फिल.,पीएच.डी. प्रवेश परीक्षेकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी ऑनलाईन अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यामध्ये ऑगस्टमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे काही विद्यार्थ्यांना एम.फिल.,पीएच.डी. चे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरता आले नाहीत. ही बाब विचारात घेता एम.फिल.,पीएच.डी. प्रवेश परीक्षेचे ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता ७ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. एम.फिल, पीएच.डी. प्रवेश परीक्षेच्या अनुषंगाने www.unishivaji.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर M.Phil/PhD Admission २०१९-२० या लिंकवर प्रवेश सूचना व माहिती पुस्तिका उपलब्ध आहेत.